नि. दि. दावा क्र.१०३/२०१८
लक्ष्मण व ईतर वि. सुर्यभान व ईतर

**निशाणी क्र.४०**

**प्रतिवादी क्र.२ बालचंद केशरचंद जैन यांचा पुढील सरतपास वकील श्री. आर. एस. देशमुख यांचे मार्फत –**

माझ्या सरतपासातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

पुढील सरतपास संपला.

**वादीतर्फे उलटतपास**

**वकील श्री के. जी. भोसले यांचे मार्फत**

माझे इयत्ता नववी पर्यंत शिक्षण झालेले आहे. माझे मुळ गाव राणी उंचेगाव आहे. दावा मिळकतीचे मुळ मालक नागोजी खेमाजी काटे हे होते, याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नागोजी खेमाजी काटे यांना किती मिळकती होत्या, तसेच किती घरांच्या जागा होत्या, हे मला सांगता येणार नाही. नागोजी हे वादी क्र.१ यांचे आजोबा असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नागोजी कोणत्या वर्षी मरण पावले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.१ कोणत्या वर्षी जन्मले याची मला माहिती नाही. वादी यांचे वडील रामभाऊ काटे हे कधी मरण पावले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नागोजी खेमाजी काटे यांना किती मुले व किती मुली होत्या याची मला माहिती नाही.

. नागोजी खेमाजी काटे यांनी सन १९७१ साली वाटण्या करून दिल्याचे मला माहिती नाही. सदर वाटणीवेळी लक्ष्मण काटे हे अज्ञान असल्याचे मला माहिती

नाही. हे म्हणणे खरे नाही की, नागोजी खेमाजी काटे यांनी वाटणीपत्रा आधारे त्यांची मुले व नातू यांना वाटणी करून दिले व त्याचा फेरफार क्र.६९८ असा आहे. सदर वाटणीमध्ये रामभाऊ काटे यांना एक तृतींश म्हणजे ६ एकर ५ गुंठे एवढे क्षेत्र मिळाल्याचे मला माहिती नाही. नागोजी खेमाजी काटे यांनी वादी क्र.१ यांना ६ एकर ५ गुंठे एवढे क्षेत्र अज्ञान पालनकर्ता वादी क्र.२ द्वारे वाटणीने दिली, याबाबत मला माहिती नाही. त्याअनुषंगाने त्यांच्या नावाची नोंद ७/१२ सदरी झाल्याचे मला माहिती नाही.

. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.२ हिस पैशाची गरज असल्यामुळे तिने वाद मिळकत प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे गहाण ठेवली. हे म्हणणे खरे नाही की, दि.०५.०६.१९७२ रोजी वादी क्र.२ हिने प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकतीसंदर्भात गहाणखत करून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ सज्ञान झाल्यानंतर सन १९९२ साली वादी क्र.१ व २ हे प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे रक्कम रू.३,०००/- घेऊन गेले व गहाण जमीन सोडविण्याची विनंती केली, त्यावर प्रतिवादी क्र.१ म्हणाला की, अजुन १० वर्षे बाकी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन २००२ साली पुन्हा वादी हे प्रतिवादी क्र.१ कडे गेले व गहाण जमीन सोडविण्याची विनंती केली, त्यावर प्रतिवादी क्र.१ म्हणाला की, मी ताबा देत नाही.

. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ याने कागदपत्र काढले असता त्यास

दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ याने मला बेकायदेशीररित्या विक्री केल्याचे आढळून आले. हे म्हणणे खरे नाही की, मला बेकायदेशीररित्या दावा मिळकत विक्री केली. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत माझ्या नावे जी खरेदी दिली ती वादींवर बंधनकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदीकरतेवेळी कोणतेही कागदपत्र पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी बेकायदेशीररित्या माझा मुलगा व सुनेच्या नावे दावा मिळकत वाटणीने करून दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील मजकुर मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी हेच दावा मिळकतीचे मालक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरफार नाही.

समक्ष,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by CHETAN SURESH JAGTAP
Date: 2026.03.23 16:20:46 +0530

(चेतन जगताप)

दिनांक : २३/०३/२०२६

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

घनसावंगी